मराठवाडा साथी

# धारूर महाविद्यालयात करियर मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

**किल्लेधारूर / प्रतिनिधी**



येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व कानिफनाथ बहुद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 30जुलै रोजी आरोही वोरा व शिखा साबू करियर कौंसिलर यांचे करियरविषयी विविध रोजगार व क्षेत्रात कोण कोणते विभागात आपल्याला संधी आहेत

(पान 7 वर...)

कार्यारंभ
Sunday 2022/07/31

# धारूर महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

प्रतिनिधी । धारूर

दि.३० : येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तसेच कानिफनाथ बहुद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ३० जुलै रोजी आरोही वोरा व शिखा साबू करियर कौंसिलर यांचे करियरविषयी विविध रोजगार व विविध क्षेत्रात कोण कोणते विभागात आपल्याला संधी आहेत. याविषयी मार्गदर्शन केले.

कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतून विविध क्षेत्रात सैन्यदल, मेडिकल, पॅरा मेडिकल, फार्मसी, इंजिनियरिंग, पोलीस, माहिती तंत्रज्ञान, संगणकशास्त्र, सेवा क्षेत्रात कोण कोणत्या विविध रोजगाराच्या संधी व पदवी, प्रमाणपत्र, पदव्युत्तर कोर्से सविषयी विद्यार्थ्यांना व पालकांना सविस्तर व विस्तृत माहिती दिली. विद्यार्थ्यांनी आपली आवड व अभिरुची व संधी या बाबीचा विचार करून करियर निवडावे व आपले भवितव्य उज्वल करावे असे मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला कानिफनाथ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था मोहखेडच्या अध्यक्षा ऐश्वर्या जयसिंग सोळंके यांनी या सेमिनारचे उद्घाटन केले. आपल्या परिसरातील विद्यार्थी व पालकांना आपल्या पाल्याचे करियर कोणत्या क्षेत्रात निवडावे याविषयी माहिती व मार्गदर्शन मिळावे म्हणून आपण या कार्यक्रमाचे आयोजन केल्याची माहिती दिली. प्राचार्य डॉ.गोपाळ काकडे यांनीही याप्रसंगी विद्यार्थ्यांना आपले करियर निश्चित करण्यासाठी असे कार्यक्रम महत्वपूर्ण असल्याचे मत व्यक्त केले. याप्रसंगी व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा.महादेव जोगडे, उपप्राचार्य मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा.सिद्धेश्वर काळे, करिअर कट्टा समन्वयक प्रा.डॉ. एलबी जाधवर यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाला विध्यार्थी,



पालक व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, हुतात्मा पापसिंग विद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य मिलिंद गायकवाड यांनी तर आभार प्रा.डॉ.एलबी जाधवर यांनी मानले.

प्रतिवीर

# धारूर महाविद्यालयात करियर मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न




**किल्लेधारूर/प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व कानिफनाथ बहुद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ३०जुलै रोजी आरोही वोरा व शिखा साबू करियर कौंसिलर यांचे करियरविषयी विविध रोजगार व क्षेत्रात कोण कोणते विभागात आपल्याला संधी आहेत याविषयी मार्गदर्शन केले.कला,वाणिज्य व विज्ञान शाखेतून विविध क्षेत्रात सैन्यदल, मेडिकल,पॅरा मेडिकल, फार्मसी,इंजिनियरिंग,पोलीस, माहिती तंत्रज्ञान, संगणकशास्त्र, सेवा क्षेत्रात कोण कोणत्या विविध रोजगाराच्या संधी व पदवी, प्रमाणपत्र, पदव्युत्तर कोर्सेसविषयी विद्यार्थ्यांना व पालकांना सविस्तर व विस्तृत माहिती दिली. विद्यार्थ्यांनी आपली आवड व अभिरुची व संधी या बाबीचा विचार करून करियर निवडावे व आपले भवितव्य उज्वल करावे असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कानिफनाथ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था मोहखेडच्या अध्यक्षा मा ऐश्वर्याताई जयसिंग सोळंके यांनी या सेमिनारचे उद्धघाटन केले व आपल्या परिसरातील विद्यार्थी व पालकांना आपल्या पाल्याचे करियर कोणत्या क्षेत्रात निवडावे याविषयी माहिती व मार्गदर्शन मिळावे म्हणून आपण या कार्यक्रमाचे आयोजन केल्याची माहिती दिली. प्राचार्य डॉ गोपाळ काकडे यांनीही याप्रसंगी विद्यार्थ्यांना आपले करियर निश्चित करण्यासाठी असे कार्यक्रम महत्वपूर्ण असल्याचे मत व्यक्त केले. याप्रसंगी व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा महादेव जोगडे,उपप्राचार्य मेजर मिलिंद गायकवाड,पर्यवेक्षक प्रा सिद्धेश्वर काळे,करिअर कट्टा समन्वयक प्रा डॉ एल बी जाधवर यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाला विध्यार्थी, पालक व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,हुतात्मा पापसिंह विद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य मेजर मिलिंद गायकवाड यांनी तर आभार प्रा डॉ एल बी जाधवर यांनी मानले.